# मिरा-भाईंदर,वसई- विरार आयुक्तालय

विषय :- दिनांक- ०९/१२/२०२२ रोजीचे पेपर कात्रणाबाबत.

१) गुन्हेगारी घटना  २) कायदा व सुव्यवस्था ३) राजकीय घटना ४) इतर

| अ. क्र. | दिनांक | वर्तमान पत्राचे नांव | बातमीचा मथळा (त्ड्ढड्डत्दढ़) | संबंधीत पो.ठाणे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | ०९.१२.२०२२ | पुण्यनगरी पु.पा.०१ | पाण्याच्या वादातून सचिव व कुटुंबाला मारहाण | नालासोपारा | |
| २. | ०९.१२.२०२२ | पुण्यनगरी पा.नं .०३ | पोलीसांना न्यायालयात खाकी वर्दी सक्तीची | इतर | |
| ३. | ०९.१२.२०२२ | पुण्यनगरी पा.नं १व ५ | दोन्ही सभागृहांत शिवरायांच्या अवमानाचा मुद्दा गाजला | इतर | |
| ४. | ०९.१२.२०२२ | पुण्यनगरी पा.नं १व ५ | महाराष्ट्रातील वीज कर्मचारी बेमुदत संपाचा निर्णय | इतर | |
| ५. | ०९.१२.२०२२ | लोकसत्ता पु. पा .०१ | घोडबंदर गावाला धुळीचा विळखा | काशिमीरा | |
| ६. | ०९.१२.२०२२ | पुढारी पु. पा .०४ | धोकादायक जुचंद्र जलकुंभ तोडून जादा क्षमतेचा जलकुंभ बांधावा | वालीव | |
| ७. | ०९.१२.२०२२ | लोकसत्ता पु. पा .०१ | दोन हजार वनहक्क दावे प्रलंबित | वसई-विरार | |
| ८. | ०९.१२.२०२२ | लोकसत्ता पु. पा .०१ | वसईतील १५ ग्रामपंचायत निवडणुकीसाठी ३३८उमेदवार रिंगणात | वसई तालुका | |
| ९. | ०९.१२.२०२२ | पुढारी पा. नं .०३ | १७ डिसेंबरला महाविकासकडून हल्लाबोल | इतर | |
| १०. | ०९.१२.२०२२ | म.टा.पु. पा. ०१ | मॅरेथॉनसाठी वसई-विरार सज्ज | वसई-विरार | |

पुण्यनगरी ५.पा.-१

# पाण्याच्या वादातून सचिव व कुटुंबाला मारहाण

**नालासोपारा :** नालासोपारा पश्चिम, छेडानगर परिसरातील ओम वरदविनायक सोसायटीमध्ये पाण्याच्या वादातून सोसायटीचे सचिव व कुटुंबाला बेदम मारहाण करण्यात आली. याप्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना बुधवारी घडली आहे. तर मारहाण करून फरार झालेल्या चार जणांचा शोध सुरू असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विलास सुपे यांनी सांगितले.

मिळालेल्या माहितीनुसार, छेडानगरमध्ये ओम वरदविनायक सोसायटी आहे. सोसायटीचे मेन्टेनन्स थकवल्याने सोसायटीने पांडे नामक व्यक्तीच्या फ्लॅटचे पाणी तोडले होते. त्या रागातून सात ते आठ जणांनी सोसायटीचे सचिव असलेल्या कृष्णा चव्हाण व त्यांच्या पत्नीला बांबू आणि लोखंडी रॉडने बेदम मारहाण केल्याचा आरोप आहे. या मारहाणीत ते गंभीर जखमी झाले असून, उपचारासाठी त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी नालासोपारा पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करून फरार आरोपींचा शोध घेण्यासाठी पथक पाठवण्यात आले आहे. या गुन्ह्यात पांडे व चव्हाण यांनी परस्परविरोधी गुन्हे दाखल केले आहेत.




# पोलिसांना न्यायालयात खाकी वर्दी सक्तीची

## वकिलाच्या आक्षेपानंतर उच्च न्यायालयाची सूचना

**मुंबई :** न्यायालयात हजर राहणारे पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना न्यायालयात खाकी वर्दी घालणे बंधनकारक असल्याचे उच्च न्यायालयाने स्पष्ट केले. न्यायालयात हजेरी लावणारे पोलीस अधिकारी सामान्य पोशाखात हजर राहत असल्याने ॲड. सुभाष झा यांनी जोरदार आक्षेप घेतला. याची दखल घेत न्यायमूर्ती ए. एस. गडकरी आणि न्यायमूर्ती पी. डी. नाईक यांच्या खंडपीठाने पोलिसांना न्यायालयात खाकी वर्दीत राहण्याची सूचना केली.

एका खटल्याची सुनावणी सुरू असताना या खटल्यातील महिला पोलीस अधिकारी खाकी वर्दी परिधान न करता सामान्य पोशाखात न्यायालयात हजर झाल्या. यावेळी ॲड. सुभाष झा यांनी जोरदार आक्षेप घेतला. याची खंडपीठाने गंभीर दखल घेतली.

सर्वसाधारणपणे न्यायालयात हजेरी लावणारे अनेक पोलीस अधिकारी हे खाकी वर्दीऐवजी सामान्य पोशाख परिधान करतात. काही महिला अधिकारी जीन्स देखील परिधान करतात. त्यांच्या अशा पोशाखामुळे पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांकडून अपेक्षित असलेले न्यायालयीन शिष्टाचाराचे पालन होत नाही, असा दावा झा यांनी केला. त्यावर न्यायालयाने अतिरिक्त सरकारी वकील संगीता शिंदे यांना याबाबतीत लक्ष घालण्याचे निर्देश दिले. त्यावर झा यांनी आक्षेप घेतलेल्या महिला पोलीस अधिकारी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेशी संलग्न असून या शाखेच्या अधिकाऱ्यांना सरकारी गणवेश (खाकी वर्दी) परिधान करणे बंधनकारक नसल्याचे ॲड. शिंदे यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले. यापुढे न्यायालयासमोर हजर राहणारे सर्व पोलीस कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी खाकी वर्दी परिधान करणे अपेक्षितच आहे, अशा सूचना दिल्या.

← पुण्यनगरी पा.नं.३०

पुण्यनगरी पा.क्र. १ व ५.

# दोन्ही सभागृहांत शिवरायांच्या अवमानाचा मुद्दा गाजला

**।नवी दिल्ली :** महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडून छत्रपती शिवाजी महाराजांचा वारंवार अवमान केला जात असल्याचा मुद्दा गुरुवारी पुन्हा एकदा संसदेच्या दोन्ही सभागृहांत गाजला. शिवसेनेचे विनायक राऊत आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे डॉ. अमोल कोल्हे यांनी लोकसभेत, तर वंदना चव्हाण यांनी राज्यसभेत या मुद्द्याला वाचा फोडली.



संसदेच्या हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशीही महाराष्ट्रातील खासदारांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचा अवमान होत असल्याच्या मुद्द्यावर संसदेच्या दोन्ही सभागृहांत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली. महाराष्ट्राचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्याकडून छत्रपती शिवाजी महाराजांचा वारंवार अवमान केला जात आहे, अशी तक्रार शिवसेनेचे खासदार विनायक राऊत यांनी केली.


राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी संसदेत आपले म्हणणे मराठीत मांडले. ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे महाराष्ट्राचेच नाही तर संपूर्ण देशाचे आराध्य दैवत आहेत. आमच्या शिवभक्तांसाठी छत्रपती शिवाजी महाराज देव नाहीत, पण देवापेक्षा कमी नाहीत. तरीसुद्धा महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल ▶▶ **पान ५ वर...**

**■ भाषण सुरू असताना खा. कोल्हेंचा माईक बंद**

**शिवरायांविषयी अवमानजनक वक्तव्यांसंदर्भात ठोस कायद्याची तरतूद करण्याची मागणी अधिवेशनात खा. डॉ. अमोल कोल्हे यांनी केली असता त्यांचा माईक जाणीवपूर्वक बंद केल्याची घटना गुरुवारी संसद भवनात घडली. दरम्यान, संसदेतील माईक जरी बंद केला तरी शिवभक्तांच्या भावना आणि त्यांचा आवाज बंद करता येणार नाही. तो कानठळ्या बसवल्याशिवाय राहणार नाही, अशी भावना खासदार डॉ. कोल्हे यांनी व्यक्त केली.**

# महाराष्ट्रातील वीज कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपाचा निर्णय

**।मुंबई :** वीज उद्योगाचे खासगीकरण- अदानी कंपनीमार्फतच्या धोरणाविरुद्ध वीज कंपन्यांतील कर्मचारी, अभियंते अधिकाऱ्यांच्या ३० संघटनांनी १८ जानेवारीपासून आंदोलन व बेमुदत संपाचा निर्णय घेतला



आहे. १२ डिसेंबरपासून महाराष्ट्रात द्वारसभा घेणे, १९ डिसेंबरपासून बेमुदत असहकार आंदोलन, २३ डिसेंबरपासून नागपूर विधानभवनवर मोर्चा, २ जानेवारी रोजी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा, ४ जानेवारीपासून ७२ तासांचा संप, तर १८ जानेवारीपासून बेमुदत संप करण्याचा निर्णय कर्मचारी संघटनांनी घेतला आहे.

अदानी इलेक्ट्रिकल या कंपनीने महाराष्ट्र सरकारच्या अधिकार क्षेत्रातील वीज कंपनीला समांतर नवीन लायसंसी स्थापित करून गडगंज १००० कोटी रुपयांपेक्षा जास्त महसूल मिळवून देणाऱ्या नवी मुंबई, पनवेल, उरण, ठाणे, मुलुंड, भांडुप, तळोजा क्षेत्रातील हे असा ५ लाख वीज ग्राहकांचे क्षेत्र महावितरण कंपनीऐवजी अदानी इलेक्ट्रिकल कपनीला हस्तांतरित व्हावा म्हणून महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोगाकडे अर्ज करून तसा परवाना मागितला आहे. खासगी कॉर्पोरेट घराण्याने पूर्णतः औद्योगिक विकास झालेल्या व भविष्यात होणाऱ्या विभागावर जास्तीत जास्त नफा कमावण्याच्या उद्देशाने समांतर परवान्याची मान्यता मिळावी म्हणून अर्ज केला त्याला संघर्ष समितीमधील सर्व संघटनांनी तीव्र विरोध केला आहे.

महावितरण कंपनी मिळवत असलेला नफा राज्यांच्या हिताकरिता, विकासाकरिता वापरला जातो, तर अदानी सेवा करण्याकरिता नव्हे, तर जास्तीत जास्त नफा कमवण्याच्या उद्देशाने या क्षेत्रात असल्याचे मत संघटनांनी व्यक्त केले आहे. या पद्धतीने खासगीकरण झाले, तर कृषी ग्राहकांना जी स्वस्त दरात वीज देतो ती ▶▶ **पान ५ वर...**

# दोन्ही सभागृहांत शिवरायांच्या अवमानाचा मुद्दा गाजला

**(पान १ वरून)** अवमानकारक वक्तव्य केली जात आहेत. अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी कायद्यात ठोस तरतूद व्हावी, जेणेकरून कोणाचीही हिंमत होणार नाही अशी वक्तव्य करण्याची, असेही कोल्हे म्हणाले.

दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेसच्या खासदार वंदना चव्हाण यांनीसुद्धा राज्यसभेत हा मुद्दा उपस्थित करण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसच्या रजनी पाटील आणि वंदना चव्हाण यांनी नियम २६७ अंतर्गत काम रोको प्रस्ताव नोटीस देत या मुद्द्यावर सभागृहात चर्चा घडवून आणण्याची मागणी केली. तत्पूर्वी सेनेचे खासदार विनायक राऊत, राजन विचारे आणि धैर्यशील माने यांनी सकाळी संसदेतील शिवाजी महाराजांच्या पुतळ्यापुढे राज्यपालांच्या विरोधात घोषणाबाजी केली.

# महाराष्ट्रातील वीज कर्मचाऱ्यांचा बेमुदत संपाचा निर्णय

**(पान १ वरून)** क्रॉस सबसिडी अदानीच्या भागातील शून्य झाल्यामुळे त्याचा वीजदरावर परिणाम होऊन विजेचे दर वाढतील व शेतकरी, घरगुती ग्राहक, दुर्बल घटकांना स्वस्त दरात वीज देणे अशक्य होईल.महाराष्ट्र सरकारने राज्यातील कृषी ग्राहकांसाठी स्वतंत्र कृषी कंपनी स्थापन करण्यासाठी माजी ऊर्जा सचिव जयंत कावळे यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी स्थापन केली आहे. ज्या माध्यमाने नफा देणारे वीज ग्राहक व तोटा देणारे वीज ग्राहक उदा : कृषीपंप, सार्वजनिक पाणीपुरवठा, दिवाबत्ती, घरगुती ग्राहक व कृषी कंपनीच्या माथी मारण्याचा प्रयत्न करण्याच्या स्पर्धेत असल्याने संघटनांनी तीव्र विरोध केला आहे.

लोकसत्ता पृ.पा.७

# घोडबंदर गावाला धुळीचा विळखा

## नागरी वस्तीत सिमेंट कॉंक्रीट प्रकल्प, महापालिकेचे नागरिकांच्या आरोग्याकडे दुर्लक्ष

**लोकसत्ता वार्ताहर**



**ज्या ठिकाणी सिमेंट कॉंक्रीट प्रकल्प नियमांचे उल्लंघन करून सुरू आहेत. अशा प्रकल्पांवर पालिकेकडून कठोर कारवाई केली जाईल.** - मारुती गायकवाड - उपायुक्त, मीरा-भाईंदर महापालिका

**भाईंदर :** मीरा-भाईंदर महापालिका हद्दीतील ऐतिहासिक अशा घोडबंदर गावाला सध्या धुळीचा विळखा बसला आहे. शहरातील बहुतांश सिमेंट कॉंक्रीट प्रकल्प (आरएमसी प्लान्ट) हे येथील नागरी वस्तीत सुरू असल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांना जगणे असह्य होऊ लागले आहे. तर या संदर्भात तक्रार करूनदेखील प्रशासन पाऊल उचलत नसल्यामुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे.

मुंबई-अहमदाबाद महामार्गालगत असलेल्या घोडबंदर किल्ल्याच्या पायथ्याशी घोडबंदर हे गाव वसलेले आहे. या गावाची लोकसंख्या ही साधारण ५ हजारांहून अधिक आहे. परंतु हे गाव मूळ मीरा भाईंदर शहरापासून लांब असल्यामुळे अनेक वेळा पालिकेच्या सुखसुविधेपासून वंचित राहते. अशा परिस्थितीत आता येथील नागरिकांना गेल्या दोन वर्षांपासून प्रचंड प्रमाणात धुळीचा त्रास सहन करावा लागत आहे.

प्रामुख्याने ही धूळ येथे उभारण्यात आलेल्या सिमेंट कॉंक्रीट प्रकल्पामुळे निर्माण होत आहे. साधारण या गावालगत सात ते आठ प्रकल्प आहेत. एक प्रकल्प तर नागरी वस्तीपासून हाकेच्या अंतरावरच उभारण्यात आला आहे. या प्रकल्पातून मोठ्या प्रमाणावर सिमेंटची बारीक पावडर हवेत उडत असते. शिवाय तयार सिमेंट कॉंक्रीट वाहून नेणाऱ्या मिक्सरमधून रस्त्यावर पडणारे सिमेंट वाळून नंतर रस्त्यावर प्रचंड धूळ जमा होत आहे. हवेत उडणारी धूळ एवढी आहे की नागरिकांना आपल्या घरात स्वच्छता राखणेदेखील कठीण होऊ लागले आहे. तर सतत धुळीच्या संपर्कात आल्यामुळे नागरिकांना श्वसनाचा त्रास, अस्थमा, सर्दी, खोकला यांसारखा आजार होऊ लागला आहे.

रहिवासी क्षेत्रापासून पाचशे मीटर अंतरापर्यंत आरएमसी प्रकल्पांना परवानगी देऊ नये, असा प्रस्ताव काही वर्षांपूर्वी महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत संमत करण्यात आला आहे. मात्र त्यानंतरही हे प्रकल्प गावालगतच उभे राहत आहेत. यातील काही प्रकल्पांना महापालिकेने दिलेल्या परवानगींची मुदतही संपली आहे. त्यामुळे आता हे प्रकल्प बंद करण्यात यावेत अशी मागणी स्थानिक नागरिक करत आहेत.

पुढारी पृ.पा.४

# धोकादायक जुचंद्र जलकुंभ तोडून जादा क्षमतेचा जलकुंभ बांधावा - भोईर

**वसई : पुढारी वृत्तसेवा**

नायगाव पूर्वेतील जुचंद्र विभागास पाणीपुरवठा करणाऱ्या जुचंद्र जलकुंभाची अत्यंत दुरवस्था झालेली असून सध्या हा जलकुंभ धोकादायक झालेला आहे. एकूण एक लाख ऐंशी हजार लिटर्स क्षमतेचा हा जलकुंभ ग्रामपंचायत कालीन २० ते २५ वर्षे जुना आहे. जलकुंभाच्या आरसीसी पिलर्सना मोठमोठे तडे गेलेले असून त्याच्या आतील लोखंडी सळ्या दिसत आहेत. या जलकुंभाचे प्लास्टर व कॉंक्रीटचे तुकडे अधूनमधून पडत असून त्यामुळे जलकुंभाखाली बसणाऱ्या पालिका कर्मचारी किंवा मुख्य रस्त्यावरून येजा करणाऱ्या नागरीकांच्या जीविताला धोका निर्माण झालेला आहे.

जुचंद्र जलकुंभाच्या दुरुस्तीसाठी महापालिकेच्या वतीने ४० लाखाचा निधी मंजूर असला तरी या धोकादायक जलकुंभाच्या दुरूस्ती ऐवजी त्याजागी जास्त क्षमतेचा उंच जलकुंभ बांधण्याची मागणी माजी सभापती कन्हैया भोईर यांनी महापालिका प्रशासनास लेखी निवेदनाव्दारे केलेली आहे. तसेच याकामी भोईर यांच्याकडून सातत्याने पाठपुरावा सुरू आहे.

धोकादायक झालेल्या जुचंद्र जलकुंभ हा मुख्य रस्त्यालगत असून याच ठिकाणी दर सोमवारी आठवडा बाजार भरतो. याच जलकुंभाशेजारी जुचंद्र विभागीय कार्यालय, आरोग्य केंद्र तसेच माता बालसंगोपन केंद्र आहे. त्यामुळे जलकुंभ आवारात मोठ्या प्रमाणावर नागरीकांचा वावर असतो. त्यामुळे धोकादायक झालेला हा जुचंद्र जलकुंभ कोसळल्यास मोठी जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या जीर्ण जलकुंभाच्या खाली अनेक वेळा प्लास्टर व कॉंक्रीटचे तुकडे पडून पंपिंग स्टेशनचे पत्रे फुटलेले आहेत.

लोकसत्ता पृ. ५।१.

# दोन हजार वनहक्क दावे प्रलंबित

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** वसई प्रात अधिकारी यांनी पालिका क्षेत्रात वनहक्क दाव्यासाठी स्थापन केलेल्या समित्यांमधून पालिकेच्या भोंगळ कारभारामुळे हजारो वनहक्क दावे रखडले आहेत. अनेक त्रुटींमुळे ५०० हून अधीक दावे पालिकेकडे दुरूस्तीसाठी पाठविण्यात आले आहेत. मात्र पालिकेने अद्याप यावर कोणतीही कारवाई केलेली नाही. दोन हजार ६८३ दावे पालिकेच्या क्षेत्रात आहेत.

वनहक्क दावे निकाली काढण्याच्या शासनाच्या सुचना आल्याने वसई प्रांत अधिकारी यांनी महापालिका, महसूल, वन विभाग यांच्या संयुक्त प्रभागनिहाय समित्या स्थापन करण्यात आल्या होत्या, या समितीच्या मार्फत दावा दाखल केलेल्या जमिनीची सर्वोपरी पहाणी करून, त्याचे भौगोलिक निर्देशांक जोडून देण्याचे काम पालिकेकडे आहे. मात्र पालिकेने या कामात अनेक त्रुटी ठेवल्या आहेत.

शासनाने सन २००६ मध्ये अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी समूहाला त्या कसत असलेल्या जमिनी वन हक्क कायद्यनुसार नावावर करून देण्यास मान्यता दिली होती. या नियमातून महापालिका क्षेत्र वगळण्यात आले होते. परंतु सन २००८ नंतर २०१२ मध्ये या कायद्यात दुरुस्ती करून महापालिका क्षेत्राचा समावेश करण्यात आला आहे. पण पालिकेने वनहक्क समिती स्थापन केली नसल्याने इतकी वर्षे हे दावे प्रलंबित होते.

वसई प्रांत विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार पालिकेने २ हजार ६८३ दाव्यांपैकी, केवळ १०३७ दावे दाखल करण्यात आले आहेत, यातील केवल ४०० दावे परिपुर्ण असून इतर दाव्यांत त्रुटी असल्याचे सांगितले आहे.

लवकरच या ४०० दाव्यांसाठी बैठक घेऊन जिल्हाधिकारी यांच्याकडे सुनावणी पाठविले जाणार आहेत. याबाबत माहिती देताना प्रांत अधिकारी सुनील तांगडे यांनी सांगितले की, वनहक्क दाव्यांचे काम नियमित सुरू आहे. लवकर त्यांचे काम पुर्ण करून पुढील प्रक्रिया राबविल्या जातील अशी माहिती त्यांनी दिली आहे.

## 'अतिक्रमणे हटवा'

अनेक वनविभागाच्या जमिनीवर बेकायदेशीरपणे अतिक्रमण झाले आहे. त्यात दावे दाखल केलेल्या जमीन सुद्धा अतिक्रमणाखाली आहेत. यात अनेक ठिकाणी घरे, शेती, व्यावसायिक बांधकामे, इमारती, चाळी बांधण्यात आल्या आहेत. यामुळे दावे निकाली काढण्याअगोदर हे अतिक्रमण हटविण्यात यावे अशी मागणी आदिवासी संघटनांनी केली आहे.

# वसईतील १५ ग्रामपंचायत निवडणुकीसाठी ३३८ उमेदवार रिंगणात

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** वसईतील १५ ग्रामपंचायत निवडणुकीसाठी ३३८ उमेदवार रिंगणात उतरले आहेत. यात सरपंच पदासाठी ४६ तर सदस्यपदासाठी २९२ उमेदवार निवडणूक लढवीत आहेत.

वासळई, रानगाव, तरखड, खार्डी डोलीव, टेंभी कोल्हापूर, टिवरी, खोचिवडे, टोकरे- खैरपाडा, पाणजू, पारोळ, तिल्हेर , करंजोन, नागले, मालजीपाडा आणि कळंब अशा ग्रामपंचायतींत निवडणुका होत आहेत. ५१ प्रभागांत १४१ जागांसाठी १८ डिसेंबरला या निवडणुका होणार आहे. ५२७ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. छाननी वेळी यातील १ नामनिर्देशनपत्र अवैध ठरविण्यात आले होते. ४५ सरपंच व १२९ सदस्य असे एकूण १७४ उमेदवारांनी अर्ज मागे घेतले. त्यामुळे आता सरपंचपदासाठी ४६ व सदस्यपदासाठी २९२ असे एकूण ३३८ विविध राजकीय पक्ष व अपक्ष असे उमेदवार रिंगणात आहे. १४ सदस्य बिनविरोध निवडणूक आले आहेत. अशी माहिती निवडणूक विभाग अधिकारी व नायब तहसीलदार चंद्रकांत पवार यांनी दिली आहे.

पुढारी ५।१२।२०

# १७ डिसेंबरला महाविकासकडून हल्लाबोल

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील सरकार हे महाराष्ट्रद्रोही आहे. या सरकारच्या विरोधात महाविकास आघाडी १७ डिसेंबरला मुंबईत 'न भूतो न भविष्यती' असा मोर्चा काढेल, अशी घोषणा शिवसेना पक्षप्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी गुरुवारी केली.

छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल राज्यपाल भगतसिंह कोश्यारी आणि भाजप नेत्यांनी केलेली वक्तव्ये तसेच महाराष्ट्र-कर्नाटक सीमा वादावर राज्य सरकारने घेतलेल्या बोटचेप्या भूमिकेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीचा हा मुंबई हल्लाबोल मोर्चा असेल, असे ते म्हणाले. या मोर्चाच्या तयारीसाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांची आणि घटक पक्षांची बैठक विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्या निवासस्थानी झाली. त्यानंतर झालेल्या पत्रकार परिषदेत उद्धव बोलत होते.

ते म्हणाले, आज जाणीवपूर्वक महाराष्ट्र तोडण्याचे प्रयत्न सुरू आहेत. कधी नव्हे ते सीमेवरील गावे आजूबाजूच्या राज्यात जाण्याची मागणी करत आहेत. मुंबई तोडण्याचे मनसुबेही आधीपासूनच आहेत. गुजरातच्या विजयासाठीच महाराष्ट्रातून उद्योग पळविण्यात आले. आता कर्नाटक विधानसभा निवडणुकासाठी महाराष्ट्रातील गावांचे लचके तोडण्याचे उद्योग सुरू आहेत. उद्या कर्नाटकच्या विजयासाठी भाजप महाराष्ट्रातून गावे पळविण्यास मागेपुढे पाहणार नाही, अशी टीका उद्धव यांनी केली.

कर्नाटकचे मुख्यमंत्री बसवराज बोम्मई हे आक्रमकपणे बोलत असताना राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे बोटचेपी भूमिका घेत आहेत. फक्त आमच्या खासदारांनी संसदेत आवाज उठविला. बाकीचे खासदार गप्प का होते, असा सवाल उद्धव ठाकरे यांनी केला.

शिवसेना प्रवक्ते खासदार संजय राऊत यांना कानडी गुंडांकडून येत असलेल्या धमक्यांबाबतही उद्धव ठाकरे यांनी संताप व्यक्त केला. मुंबईत येऊन हल्ला करायला मुंबई नेभळट नाही, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही या पत्रकार परिषदेत भाजपवरील टीका केली. ज्या १०६ हुतात्म्यांच्या बलिदानाने महाराष्ट्राची निर्मिती झाली, त्या महाराष्ट्राला तोडण्याचे कारस्थान भाजपकडून सुरू आहे. त्यांना मुंबई सुद्धा वेगळी करायची आहे. राज्यात महाराष्ट्रद्रोही सरकार सत्तेवर असून या सरकारच्या विरोधात १७ तारखेला निघणारा मोर्चा हा ऐतिहासिक ठरेल, असा दावा पटोले यांनी केला.

म.टा. पु. पा. १०

**मटा अँकर** **१५ हजार स्पर्धक घेणार धाव; करोनाकाळातील दोन वर्षांच्या खंडानंतर प्रथमच होणार स्पर्धा**

# मॅरेथॉनसाठी वसई-विरार सज्ज

**म. टा वृत्तसेवा, वसई**

वसई-विरार शहर महापालिकेतर्फे रविवारी, ११ डिसेंबर रोजी १०वी वसई विरार महापालिका मॅरेथॉन स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेमध्ये संपूर्ण देशभरातून स्पर्धकांनी सहभाग नोंदवला असून एकूण १५ हजार स्पर्धक धावणार आहेत. यासाठी सकाळच्या वेळी वसई-विरारमधील वाहतुकीच्या मार्गात बदल करण्यात आले आहेत. करोनानंतर प्रथमच वसई-विरारची मॅरेथॉन स्पर्धा होत आहे. विशेष म्हणजे, पालघर जिल्हाधिकारी यामध्ये धावणार असून पोलिस अधिकारी आणि इतर सरकारी अधिकारीदेखील सहभागी होणार आहेत.



वसई-विरार पालिकेच्या पूर्ण मॅरेथॉन स्पर्धेची सुरुवात नवीन विवा कॉलेज, विरार पश्चिम येथून, अर्ध मॅरेथॉन स्पर्धेची सुरुवात वसई गाव येथून होणार आहे. तसेच ११ किमी अंतराच्या स्पर्धेची सुरुवात नवीन विवा कॉलेज, विरार पश्चिम येथून होणार आहे. या तिन्ही मुख्य स्पर्धा व इतर स्पर्धांची अंतिम रेषा ही नवीन विवा कॉलेज, विरार पश्चिम ही असणार आहे. मॅरेथॉन स्पर्धा कालावधीत स्पर्धा मार्गावर वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला असल्याचे पालिकेतर्फे प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

ही राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा असून स्पर्धेच्या कालावधीत सकाळी ५ ते दुपारी १ वाजेपर्यंत वाहतूक कोंडी होऊन स्पर्धकांना अडथळा निर्माण होऊ नये, यासाठी स्पर्धा मार्गावर सर्व प्रकारच्या वाहनांना बंदी घालण्यात आली आहे. पोलिस उपायुक्तालय, मिरा-भाईंदर, वसई विरार पोलिस आयुक्तालय कार्यालयामार्फत ही वाहतूक नियंत्रण अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. अधिसूचनेनुसार मॅरेथॉन स्पर्धेच्या सर्व मार्गावर ११ डिसेंबर रोजी सकाळी ५ ते दुपारी १ वाजेपर्यंत सर्व प्रकारच्या वाहनांना प्रवेश बंद करण्यात आला आहे. मात्र अग्निशमन, रुग्णवाहिका, इतर अत्यावश्यक सेवेतील वाहने, महसूल विभाग, पोलिस विभाग, तालुका दंडाधिकारी, वसई-विरार महापालिकेची वाहने, मॅरेथॉन स्पर्धेसाठी परवानगी दिलेली वाहने यांना यातून वगळण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी पर्यायी मार्गांचा वापर करून पालिकेला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

## दोन विशेष लोकल

मॅरेथॉनमध्ये सहभागी स्पर्धकांसाठी पश्चिम रेल्वेतर्फे दोन विशेष गाड्या सोडण्यात येणार असल्याचे महापालिकेकडून सांगण्यात आले. पहिली लोकल पहाटे ३ वाजता चर्चगेट येथून सुटून ४.३५ ला विरार येथे पोहोचणार आहे. दुसरी लोकल पहाटे ३ वाजता चर्चगेटहून सुटून ५.०५ ला विरारला पोहोचणार आहे. या दोन्ही लोकल सर्व स्थानकांत थांबणार आहेत.